# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 12 जून 2003
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री साबाजी त्रिंबक राणे | 17. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 18. श्री मधुसुदन श्रीधर राणे |
| 3. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे | 19. श्री धोंडू रघुनाथ राणे |
| 4. श्री गंगाराम महादेव राणे | 20. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 5. श्री वासुदेव रावजी म्हसकर | 21. श्री जयवंत नाना राणे |
| 6. श्री श्रीकांत प्रभाकर राणे | 22. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 7. श्री सुनिल सदानंद राणे | 23. श्री मंगेश मनोहर राणे |
| 8. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 24. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 9. श्री विनोद विठोबा राणे | 25. श्री हेमंत हरिश्चंद्र राणे |
| 10. श्री मंगेश यशवंत सावंत | 26. श्री हरिश प्रकाश राणे |
| 11. श्री उत्तम वामन राणे | 27. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे |
| 12. श्री उदय भगवान राणे | 28. श्री सुरेश दत्ताराम राणे |
| 13. श्री लवू शिवाजी राणे | 29. श्री अविनाश बाळकृष्ण राणे |
| 14. श्री लक्ष्मण शिवाजी राणे | 30. श्री अविनाश कृष्णाजी राणे |
| 15. श्री विश्वास पुंडलिक राणे | 31. श्री विश्वनाथ दिनकर राणे |
| 16. श्री भरत गणपत राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्था, मुंबई हिची विशेष सभा रविवार दिनांक 12 जानेवारी 2003 रोजी शिरोडकर हायस्कूल परेल येथे संपन्न झाली.

संस्थेचे अध्यक्ष अनुपस्थित असल्यामुळे प्रथम अध्यक्षांची निवड करण्यात आली व सर्वानुमते श्री साबाजी त्रिंबक राणे यांचे नाव सुचविण्यात आले व त्यास सर्वानुमते मान्यता मिळाली.

अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर विषयपत्रिकेप्रमाणे कामकाजास सुरवात करण्यात आली.

1. चिटणीसांनी सभाग्रहास इतिवृत्त वाचून दाखविले त्या इतिवृत्तास सर्वांनी मान्यता दिली.
2. दुसऱ्या विषयाप्रमाणे संस्थेची वाटचाल, चिटणीसांनी केलेले कार्य व कोणत्या प्रकारची कामे झाली याचा गोषवारा सभाग्रहास सादर केला व यापुढे ही अशी महत्वाची कामे बाकी आहेत त्यासाठी नवीन कार्यकारीणी व कार्यकर्त्यांची संस्थेस गरज आहे याची जाणीव सभाग्रहास करून दिली.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(33 to 35)

3. यानंतर थकबाकी वर्गणी या विषयावर चर्चा झाली सन 1997 ते मार्च 2003 पर्यंत किती वर्गणी बाकी आहे व किती सभासदांची वर्गणी आली या विषयावर चर्चा करण्यात आली. सभाग्रहाचे असे म्हणने पडले की सन 1997 पर्यंत निवडक सभासदांची वर्गणी आलेली आहे व बाकी वर्गणी वसुल होणे अत्यंत आवश्यक आहे. या विषयामध्ये चर्चेत बहुतेक सभासदांनी भाग घेतला. विशेषत: श्री अशोक दत्ताराम राणे, श्री मधुसुदन श्रीधर राणे, श्री रत्नकांन्त बालशिवाजी राणे, श्री अविनाश कृष्णाजी राणे, श्री भरत गणपत राणे यांनी आपली मते परखडपणे मांडली व असे ठरले की वर्गणी वसुल करण्यासाठी प्रत्येक कुटूंबातील एका व्यक्तीने पुढाकार घेऊन ही वर्गणी वसुल करावी. प्रत्येक कुटूंबातील खालील व्यक्तींनी वर्गणी वसुल करण्यासाठी स्वखुशीने आपली नावे दिली व वर्गणी वसुल करण्याची जबाबदारी घेतली.
   श्री अविनाश कृष्णाजी राणे , श्री सुरेश दत्ताराम राणे, श्री मंगेश मनोहर राणे, श्री साबाजी त्रिंबक राणे, श्री जयवंत नाना राणे, श्री अंकुश महादेव राणे, श्री प्रकाश हरिश्चद्र राणे, श्री हेमंतकुमार रमेश राणे, श्री रत्नकांन्त बालशिवाजी राणे, श्री उदय भगवान राणे, श्री धोंडू रघुनाथ राणे, श्री विश्वनाथ दिनकर राणे.

---